महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४४ वा | दिनांक : ०२/०३/२०२५ | वार : रविवार

## स्वारगेट रेप केस संमतीचे संबंध होते का ? राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला नेत्याचे सूचक विधान



**पुणे** : पुण्यातील स्वारगेट बसस्थानकावर शिवशाही बसमध्ये झालेल्या अत्याचार प्रकरणामुळे अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याला गुरुवारी मध्यरात्री शिरुर तालुक्यातील गुनाट गावातून अटक केली आहे. आरोपीच्या वकिलांनी हे प्रकरण संमतीच्या शारीरिक संबंधांचे असल्याचा दावा केला आहे. त्यानंतर आता सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनीही त्यांच्या या दाव्याची अप्रत्यक्षपणे पुष्टी करणारे विधान केले आहे.

पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात मंगळवारी पहाटे (२५ फेब्रुवारी) एका २६ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना घडली. हे प्रकरण दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवारी उजेडात आले आणि एकच खळबळ माजली. त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणी तपासाची वेगवान चक्रे फिरवून आरोपीला अटक केली. या प्रकरणी कोर्टाने आरोपी दत्तात्रय गाडे याला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. यावेळी झालेल्या सुनावणीत आरोपीच्या वकिलांनी हे प्रकरण बलात्काराचे नव्हे तर संमतीच्या शारीरीक संबंधांचे असल्याचा दावा केला. त्यांचा हा दावा सरकारी पक्षाचे खोडून काढला.

पण आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनीही अप्रत्यक्षपणे असाच दावा केला आहे. त्यांनी आपल्या फेसबुक पोस्टद्वारे तसे संकेत दिलेत.

रुपाली पाटील ठोंबरे आपल्या फेसबुक पोस्टमध्ये म्हणतात, पुणे शिवाजी कोर्टात बसस्टँड मधील आरोपीला आणायच्या वेळी डी.सी.पी. गिल साहेब यांनी माझीच चौकशी केली. मॅडम तुम्ही आंदोलन करणार असेल,आरोपीला काळे फसणार करणार असेल तर प्लीज करू नका. त्याचवेळी साहेबांना सांगितले, घटनेची खरी माहिती घेऊन त्याची प्राथमिक माहिती खरी असल्याची खात्री केल्याशिवाय मी बोलतही नाही आणि कोणतेच आंदोलन मी करणार नाही. तुम्हाला विश्वास नसेल तर तुमच्या सोबत थांबते. मला कोर्टात रिमांड रिपोर्ट पहायचा आहे. केसची माहिती घेणे केसचा स्टडी करणे गरजेचे आहे.

पण बस स्टँड घटनेत, पुणे नाहकच बदनाम झाले ऐका संमतीच्या संबंधात व्यवहाराचे पैसे दिले नाही म्हणून याचे प्रचंड खेद वाटतो. दुसरे बसस्टँड आगराची व्यवस्थापनाचा भोंगळ कारभार बाहेर आला. आता त्यांना सुट्टी नाही. नोकरीवर काम चोख करा नाहीतर घरी बसा कायमचे. तूर्तास एवढेच, असे रुपाली पाटील ठोंबरे यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

## विरोधी पक्षनेतेपदासाठी ठाकरेंच्या पक्षाला मविआत पाठिंबा नाही - संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर** : संजय राऊत यांना संख्याबळ कळते का काही, विरोधी पक्षनेते पद मिळवण्यासाठी किती संख्या पाहिजे, ते लागेल का नाही, मविआतील कोणत्याच पक्षाकडे संख्याबळ नाही. हा अधिकार विधानसभा अध्यक्षांचा आहे, असे मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, अध्यक्ष राहुल नार्वेकर काय निर्णय घेतील हा भाग वेगळा आहे. पण कायदेशीर दृष्टीने पाहिले तर मविआतील कोणत्याच पक्षाचा विरोधी पक्षनेता होऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, ठाकरे गट ज्या मविआ सोबत आहेत ते यांना पाठिंबा देण्यास तयार नाही. एकही म्हणत नाही की आमचा तुम्हाला पाठिंबा आहे, यामुळे या अधिवेशनातही विरोधी पक्षनेतेपदाचा पेच कायम राहणार आहे.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, संजय राऊत एकदा म्हणतात की बंडखोरांना मातोश्रीचे दारं बंद आहेत. दुसरीकडे म्हणतात एक दिवस म्हणतात तुम्हाला मातोश्रीच्या दारात यावे लागेल, हे भाकीत नाही तर माझा दावा आहे, नेमके तुमची भूमिका काय हे कळू तरी द्या. त्यांचा मुलगा राज्यमंत्री आहे, तुमच्याकडे त्यांनी येण्याचे कारण काय? ते रामदास कदम आहेत, त्यांनी घेतलेल्या निर्णयाची त्यांना जाण आहे. तुमच्याकडे येण्याचा प्रश्नच नाही. ठाकरे गटातून जे लोकं बाहेर जात आहे ते जाऊ नये यासाठी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण उबाठाला लागलेली गळती आता थांबणार नाहीच.

## वाल्मीक कराडला कुणाचा आशीर्वाद होता? बजरंग सोनवणेंची मागणी



**बीड** : वाल्मीक कराड हा सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाचा मुख्य सूत्रधार आहे. पण त्याला कुणाचा आशीर्वाद होता? त्याच्यासह या प्रकरणी त्याला रसद पुरवणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे.

संतोष देशमुख हत्या आणि खंडणी प्रकरणात सीआयडीने १५०० हून अधिक पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. त्यात वाल्मीक कराड हाच देशमुख यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार असल्याचा दावा करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर बजरंग सोनवणे यांनी उपरोक्त मागणी केली आहे. बजरंग सोनवणे म्हणाले की, संतोष देशमुख यांची हत्या झाली त्यानंतर लगेचच मी मीडियापुढे येऊन या प्रकरणातील खरा मास्टरमाइंड पकडण्याची मागणी केली होती. कारण, ही अतिशय निंदणीय घटना होती. त्याची स्पष्टता आज होत आहे. मी हे वारंवार सांगत होतो की, याचा मास्टरमाइंड परळीत बसायचा. त्याने संपूर्ण जिल्ह्यात आपली दहशत निर्माण केली होती.

वाल्मीक कराड परळीत बसायचा. त्याला कुणाचा सपोर्ट होता हे जगजाहीर आहे. वाल्मीकने गोरगरीब लोकांना त्रास देणे, त्यांच्याकडून खंडणी गोळा करणे आदी प्रकार करून आपली दहशत निर्माण केली होती. पोलिसांनी दाखल केलेले आरोपपत्र २९ नोव्हेंबरपासूनच आहे. आवादा कंपनीने त्यापूर्वी २८ मे रोजी खंडणीचा गुन्हा दाखल केला होता. तो सुद्धा यात घेण्याची गरज आहे. तो सुद्धा असाच प्रकार आहे.

या लोकांनी प्रत्येक तालुक्यात आपला माणूस नेमला होता. धाराशिवच्या कळंब, परंडा, भूम तालुक्यातही त्यांची माणसे आहेत. सत्तेचा गैरवापर करणे, पदावर बसवलेल्या पोलिसांचा फायदा लाटणे, मर्जीतील अधिकारी बीडमध्ये आणून बसवणे असे प्रकार सुरू होते. मागील ५ वर्षांत पार मोठी दादागिरी, गुंडगिरी, दहशत बीडमध्ये पसरली होती. हे प्रकरण २८ मे २०२४ पासून सुरू झाले. पण ते तिथेच दाबण्यात आले.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये आणखी २-४ जण आढळून आलेत. ते आरोपीला पळून जाण्यात मदत करताना दिसून येत आहेत. त्यामुळे त्यांना या प्रकरणात सहआरोपी करण्याची गरज आहे. आज या घटनेतील खरा मास्टरमाइंड समोर आला आहे. आता त्याला कोण रसद पुरवत होते, त्याला कुणाचा आशीर्वाद होता, त्याच्यावरही कारवाई झाली पाहिजे, असे बजरंग सोनवणे म्हणाले.

दुसरीकडे, भाजपचे आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी वाल्मीक कराड हाच या प्रकरणातील खरा आका असल्याचे स्पष्ट केले आहे. ते एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, वाल्मीक कराड हाच या प्रकरणातील खरा आका, मुख्य सूत्रधार वगैरे आहे. हा आकाच सर्वकाही करत होता. संपूर्ण बीड जिल्ह्यात त्यांनी धुमाकूळ घातला होता. हे लोक गुंड प्रवृत्तीच्या लोकांना आर्थिक मदत करत होते. कारण, त्यांच्याकडे पैसा जास्त झाला होता ना... बोगस पैसे उचलून अशा गँग तयार करायच्या हा त्यांचा धंदा होता.

टोळ्या तयार करायच्या. त्यांना अभय द्यायचे. मग त्यांच्याकडून हवे ते काम करून घ्यायचे. असे उद्योग संपूर्ण जिल्ह्यात सुरू होता. यात वेगळे काहीच नाही. पोलिसांनी म्हणजे एसआयटीने जे मांडले आहे ते योग्यच आहे. या प्रकरणातील मूळ सूत्रधार हा वाल्मीक कराड असून, बाकीचे आरोपी त्याचे प्यादे आहेत, असे धस यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ मार्च २०२५

# मुरूम शहरात छावा चित्रपटाच्या स्क्रीनिंगसाठी भरगच्च गर्दी....




मुरूम, ता. उमरगा येथील संभाजीनगरात छावा चित्रपटाप्रसंगी संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करताना उपस्थित मान्यवर व अन्य.

**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : शहरात छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य गाथेवर आधारित छावा चित्रपट स्क्रीनिंगद्वारे बुधवारी (ता. २६) रोजी मोठ्या उत्साहात दाखविण्यात आला. सचिन शिंदे (पाटील) यांच्या संकल्पनेतून छत्रपती संभाजी राजे ग्रुपने छावा चित्रपट संभाजी नगर येथे प्रदर्शित केला.

हा चित्रपट छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित असून त्यांच्या शौर्याने प्रेरित होऊन त्यांचे कार्य समाजात पोहोचवण्यासाठी हा प्रयत्न करण्यात आला.

चित्रपटाचे प्रदर्शन सायंकाळी साडेसात वाजता सुरू झाले. शहरातील व संभाजी नगरच्या नागरिकांनी या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद दर्शविला. या स्क्रीनिंगला विशेषत: वृद्ध महिला, पुरुष आणि युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रम डिजिटल स्क्रीन आणि साऊंड सिस्टिमच्या सहाय्याने अत्यंत प्रभावीपणे नियोजन करण्यात आले होते. ज्यामुळे उपस्थितांना एक अनोखा अनुभव मिळाला. याप्रसंगी रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष कमलाकर मोटे, डॉ. आप्पासाहेब सुरवंशी, प्रकाश रोडगे, संतोष मुरूमकर, राजकुमार काकडे, माजी प्राचार्य दत्ता इंगळे, सुरज शिंदे, आप्पासाहेब पाटील, प्रकाश कंटेकुरे, कल्लू येवले, संतोष पाताळे, सतिश मुदकन्ना, देविदास नागणे, श्रीमंत शिंदे, गोपाळ शिंदे, बब्रुवान जाधव आणि अन्य ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन शिंदे व छत्रपती संभाजी राजे ग्रुपचे सदस्य आकाश शिंदे, आकाश जगदाळे, गणेश शिंदे, वैभव शिंदे, सुमित शिंदे, गोविंद जगदाळे, मल्लू तडकले, उत्तम शिंदे, राहुल आहेर, सुमित शेळके, रामजी खंडागळे, विकास शिंदे, सुनिल जाधव, आनंद सुरवसे, सागर शिंदे, पप्पू शिंदे, शहाजी भोसले आदींनी पुढाकार घेतला.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप



**उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले)** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे निवासी विशेष शिबिर १५ जानेवारी पासून मौजे जकेकुरवाडी येथे सुरू होते. "युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी" ही थीम घेवून करण्यात आला होता.

याशिबिराचा समारोप दिनांक २१ जानेवारी रोजी जेकेकुरवाडी गावामध्ये करण्यात आला सात दिवसाच्या विशेष शिबिरामध्ये वृक्ष संवर्धन, शोष खड्डे, ग्राम स्वच्छता, अंतर्गत गटारीची कामे बालविवाह निर्मूलन जनजागृती, शेतकऱ्यास मार्गदर्शन, ॲनेमिया तपासणी, ग्रामीण युवकासाठी उद्योजकीय संधी, विविध पूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रम या शिबिरादरम्यान घेण्यात आली होते.

समारोप समारंभ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक , किरण बंडे, वैभव सूर्यवंशी, आपले मनोगत व्यक्त करून सात दिवसातील अनुभव त्यांनी सर्वांसमोर मांडला. उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून सिद्धू झंपले, रोहन कांबळे, पाचंगे अर्जुन प्रमाणपत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

या शिबिराच्या निरोप समारंभाचे अध्यक्ष म्हणून डॉ वसंत गायकवाड सर यांनी विद्यार्थ्यांने केलेल्या कामाचा कौतुक करून अशा राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामुळे ग्राम विकासाला हातभार लागतो असे प्रतिपादन त्यांनी आपल्या अध्यक्षकीय भाषणात त्यांनी केले . प्रमुख उपस्थितीमध्ये जेकेकुरवाडीच्या शालेय समितीचे उपाध्यक्ष गणेश पाटील, प्रशालेचे मुख्याध्यापक दुधनाळे सर स्वयंसेवकांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

तसेच महेश माने, सुनील औरादे आणि ग्रामपंचायत सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते डॉ. गिरीधर सोमवंशी(कार्यक्रमाधिरी) डॉ. भरत शेळके (कार्यक्रमाधिकरी) प्रा. सूर्यकांत राठोड, डॉ. वसंत गायकवाड, डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, प्रा. मुरली जाधव, डॉ. अनिल देशमुख, प्रा. विजय पवार प्रा. मनोज गायकवाड, प्रा. डी.डी. पांढरे, प्रा.सचिन चव्हान, प्रा.सुजित शिंदेआदींनी शिबिराच्या यशस्वी करण्यामध्ये मोलाचे योगदान दिले .

समारोप समारंभाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.भरत शेळके सरांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सिद्धू झंपले यांनी केले तर आभार श्री प्रज्वल चव्हाण यांनी मांडले.

# होलीक्रॉस इंग्लिश हायस्कूल, छावणी येथे मराठी भाषा गौरवदिन उत्साहात साजरा











**छत्रपती संभाजीनगर** : होलीक्रॉस इंग्लिश हायस्कूल, छावणी येथे मराठी भाषा गौरवदिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या लेझिम पथकाच्या संचलनाने झाली.

यावेळी विद्यार्थी पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते. ग्रंथदिंडी द्वारे विद्यार्थ्यांनी मराठी ग्रंथांना वंदन केले.कवी कुसुमाग्रज ह्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी कविता, एकांकिका, गीते, भाषणे, सुविचार, नृत्य, लेखक व कवींची माहिती देऊन मराठी भाषेचा गौरव केला.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर सिंथिया फर्नांडिस, उपमुख्याध्यापिका सिस्टर जिनी वर्गिसे,पर्यवेक्षक मोहम्मद हाफिझ ह्यांची प्रमुख उपस्थिती होती.शाळेतील मराठी विषय शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक,विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ मार्च २०२५


# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा संपन्न



## संविधानामुळेच देशाचे अखंडत्व टिकून आहे- डॉ. दत्ताहारी होनराव

**मुरुम ( प्रा. सुधीर पंचगल्ले)** फाळणीचा इतिहास लक्षात घेता या देशातील भाषिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक विविधता लक्षात घेऊन घटनाकारांनी प्रबळ केंद्र सरकार असणारे संघराज्य निर्माण केले, राज्यांना अधिकाराच्या बाबतीत स्वायत्तता दिली नाही. तसेच या देशातील कोणत्याही घटकराज्याला फुटून बाहेर पडण्याचा अधिकार दिला नाही अशा एकात्मक संघराज्यामुळेच या देशाचे अखंडत्व टिकून आहे असे मत प्रा. डॉ.दत्ताहरी होनराव यांनी व्यक्त केले.

ते काल श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात भारतीय संविधान आणि मराठी साहित्य या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात मराठी आणि मानवी हक्क विभागाच्या वतीने संविधान गौरव महोत्सव आणि मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात दत्ताहरी होनराव यांनी भारतीय संविधानाची 75 वर्षे या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांनी देशातील वर्तमान राजकीय संस्कृतीवर ताशेरे ओढले. केंद्र-राज्य यांच्यातील वाढत्या तणावावरही त्यांनी भाष्य केले.कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मराठी कवितेतील संविधानिक मूल्ये या विषयावर मार्गदर्शन करताना साठोत्तरी कवितेतून स्वातंत्र्य, समता, बंधुता, यासारख्या मूल्यांना कवींनी आपल्या कवितेतून समाजापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे. कविता ही समाज प्रबोधनाचेच एक साधन आहे.

अनेक कवितांमधून सामाजिक न्यायाचा संदेश दिला असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात खुली चर्चा करण्यात आली. या सत्रात प्रा. किरण सगर, डॉ. दत्ताहरी होनराव, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. पद्माकर पिटले यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना मार्गदर्शन केले गेले. संविधानाच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून शहरातील पत्रकारांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी दै. पुढारीचे पत्रकार शंकर बिराजदार, दिव्य मराठीचे अंबादास जाधव, गो.ल. कांबळे आणि नारायण गोस्वामी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी संविधान गौरव महोत्सवाच्या निमित्ताने घेतलेल्या निबंध, वक्तृत्व, पोस्टर प्रदर्शन आणि सामान्य ज्ञान स्पर्धांचे पारितोषिक वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

निबंध स्पर्धेत घोडके साक्षी, गायकवाड पूजा, पवार सौंदर्य, सगर आरती यांनी पारितोषिक मिळविले. पोस्टर स्पर्धेत पवार सौंदर्य, शेंडगे वैभवी, कांबळे वैष्णवी, पटेल मेहताब, जमादार पंकज यांनी पारितोषिक मिळविले. सामान्य ज्ञान स्पर्धेत गायकवाड अनिरुद्ध, पाटील सौरभ, माने निकिता, तांबोळी उमादेवी यांनी पारितोषिक मिळविले तर वक्तृत्व स्पर्धेत पटेल मेहताब, शिंदे सिद्धिविनायक, संध्या जगताप, गंगोत्री चिंचोळे यांनी पारितोषिक मिळविले.

या कार्यशाळेचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य विलास इंगळे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पद्माकर पिटले यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. गिरीधर सोमवंशी यांनी केले तर मानवी हक्क विभागाचे समन्वयक डॉ. डी. बी. ढोबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# काशिनाथराव पाटील विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा



**कन्नड (अरुण थोरात):** जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

नोबेल पारितोषिक विजेते प्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ डॉ. सी व्ही रमण यांच्या अजरामर वैज्ञानिक कार्याचे स्मरण करणारा २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने काशिनाथ पाटील विद्यालयातील विद्यार्थ्यां साठी भाषण स्पर्धा व विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

२२ विद्यार्थ्यांनी भाषण स्पर्धेत तर विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला वाव देणाऱ्या २५ चल प्रयोगांचे सादरीकरण करण्यात आले, यात ६० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन भामरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले विज्ञान प्रदर्शनासाठी मेहनत घेणारे लक्ष्मण पांडव यांनी विज्ञान दिवसा विषयीची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया तायडे व उन्नती कुलकर्णी यांनी केले व आभार योगेश जंजाळ यांनी मानले यावेळी दीपक जाधव, जगमोहन मुंडवाडकर, ज्ञानेश्वर नायकुडे, दत्तात्रय गायके, प्रदीप भोकन, भगवान म्हैसमाळे, योगेश कुमावत, सुरज हिरे, सुनीता दाबके, सुनिता बाविस्कर, रवीना काळे, सीमा राठोड, संतोष सागरे, सुभाष जाधव यांची उपस्थिती होती.






# कन्नड येथील गौताळा व्हॅली स्कूल मध्ये विज्ञान दिन साजरा



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड शहरातील प्रसिद्ध इंग्लिश मिडियम गौताळा व्हॅली स्कूल येथे आज जागतिक विज्ञान दिवस म्हणून साजरा करण्यात आले. शाळेतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रोजेक्ट सादर करून शाळेचे व पालकांचे मनोबल वाढवले. छोट्या मुलांनी सुद्धा या ठिकाणी शेतीला लागणारे ठिबक सिस्टम, सोलर सिस्टम, मॅग्नेटिक सिस्टम, वॉटर हीटर, रूम हीटर, जेसीबी ऑपरेटिंग, पवन ऊर्जा, शुद्ध पाणी फिल्टर, ग्रह सुरक्षा आरामे, सिंचन पद्धत, चार्जिंग कुलर, कार वॉशिंग, बायोगॅस, सोलार पॅनल, विद्युत निर्मिती, बायो मेडिकल वेस्ट कचरा, चंद्र सूर्य पृथ्वीभोवती कसे फिरतात, इत्यादी प्रयोग विज्ञान द्वारे त्यांनी करून दाखवले. या ठिकाणी विज्ञान प्रदर्शनाला शाळेचे अध्यक्ष कृष्णराव पाटील, कन्नडचे तहसीलदार विद्याचरण कडवकर, गौताळा व्हॅली स्कूलचे प्रिन्सिपल राजकुमार क्षीरसागर, पोलीस उपनिरीक्षक चांद मेडके, शिवसेनेचे डॉ. सदाशिव पाटील फुलंब्री नगरपंचायत चे प्रमोद तुपे तसेच कन्नड शहरातील इंजिनीयर, विज्ञान प्रेमी, विज्ञान अभ्यासक, पालक व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले. विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी सर्वच शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०१ मार्च २०२५

## संत मीरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शाळेत २५ वा अपूर्व विज्ञान मेळावा आयोजित





**छत्रपती संभाजीनगर :** शुक्रवार दि. २८/२/२०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त संत मीरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय एन ३ सिडको, छ. संभाजीनगर शाळेत २५ वा (सिल्व्हर जुबीली) अपूर्व विज्ञान मेळावा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन २०५ विविध विज्ञान प्रयोग प्रतिकृती सादर केले होते.

प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री चौरे साहेब ( विस्तार अधिकारी), मा. श्री शर्मा सर, ( माजी मुख्याध्यापक, महाराणा प्रताप हायस्कूल), मा. श्री वानखेडे सर ( मुख्याध्यापक, एम.आय. टी. हायस्कूल) मा. सौ. राठोड मॅडम ( मुख्याध्यापिका), मा. संध्या ढाकणे मॅडम(मुख्याध्यापिका) उपस्थित होते, अध्यक्ष म्हणून प्राचार्य एन. एस. पाटील होते.

मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील काळासाठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांना श्री अनिल पाटील श्री संतोष चव्हाण, सौ. मंगल कुलकर्णी, श्री दीपक खरात, श्री विकास पदमर यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

परीक्षक म्हणून प्रा. सुनील जाधव सरप्रा. राणी दुधाळ मॅडमप्रा. पवार मॅडमयांनी काम पाहिले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## दीक्षांत समारंभात कुलगुरूकडून स्वत:ची प्रतिमा उजळ करण्याच्या प्रयत्नात विद्यार्थ्यांचा अवमान - एसएफआय

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६५ वा दीक्षांत समारंभ नुकताच पार पडला. या दीक्षांत समारंभात उपराष्ट्रपती जगदीश धनखड व महाराष्ट्राचे राज्यपाल मा.सि. पी. राधाकृष्णन यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात प्रोटोकॉल च्या नावाखाली कुलगुरूंनी आपलीच प्रतिमा उजळ करून घेण्याची आणि वरिष्ठ नेत्यांशी आपली किती जवळीक आहे हे दाखवून देण्याची हौस भागवून घेतलेली आहे.

सदर दीक्षांत समारंभात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संशोधक विद्यार्थ्यांना पदवी देऊन त्यांचा सन्मान करणे अपेक्षित असताना विद्यापीठाच्या एकही विद्यार्थ्याचा मान्यवरांच्या हस्ते पदवी देऊन सन्मान करण्यात आला नाही.

ही विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अतिशय अवमानकारक व विद्यापीठासाठी लाजिरवाणी गोष्ट आहे. मान्यवरांकडून आपला सन्मान होईल या मोठ्या अशेने आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना अपमानित होऊन माघारी परतावे लागले.

ही अतिशय अतिशय गंभीर व निषेधार्य बाब आहे. शैक्षणिक संस्थेची गुणवत्ता वाढली तर संस्थेचा लौकिक होईल मोठे व्यक्ती संस्थेत आल्याने ते होणार नाही. दीक्षांत समारंभ हा विद्यार्थ्यांसाठी असतो मोठ्या लोकांसाठी नाही.

दीक्षांत समारंभात बोलवून कोणालाच पदवी न देणे हा सर्व पदवीधरांचा अपमान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाने इव्हेंट कल्चर राबवण्यापेक्षा विद्यापीठातील वास्तविक गुणवत्ता सुधारण्यावर भर द्यावा. विद्यापीठाच्या इतिहासात दीक्षांत समारंभात असा प्रकार कधी घडलेला नाही.

संबंधित प्रकरणी तत्काळ विद्यापीठ प्रशासन व कुलगुरूंनी गंभीर दखल घेऊन परत एकदा दीक्षांत समारंभ घेऊन विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात यावा व विद्यार्थ्यांना सन्मान जनक वागणूक मिळेल याची दक्षता घ्यावी, अशी मागणी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) च्या वतीने करण्यात आले.

## वाहनांच्या हायसेक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेटसाठीचे शुल्क नाही तर जिझिया कर : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचे सरकार जनतेची लूट करण्याची एकही संधी सोडत नाही. जनता आधीच महागाईने त्रस्त असताना आता वाहनधारकांच्या खिशावर सरकारची नजर पडली आहे. वाहनांच्या हाय सेक्युरिटी नंबर प्लेटच्या नावाखाली भरमसाठ शुल्क आकारले जात आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील दर दुपटीपेक्षा जास्त असून हे शुल्क नाही तर 'जिझिया' करच आहे असा आरोप करून हे शुल्क कमी करावे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांसाठी हाय सेक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (HSRP) बंधनकारक करण्यात आली आहे. या उपक्रमाचा हेतू चांगला वाटत असला तरी या आडून राज्यातील वाहनधारकांची अक्षरशः लूट सुरु आहे. महाराष्ट्र सरकारने या नंबर प्लेटसाठी आकारलेले शुल्क हे इतर राज्यातील शुल्काच्या तुलनेत दुप्पट, तिप्पट आहे. शेजारच्या गोवा राज्यात दुचाकींसाठी १५५ रुपये आकारले जातात तर महाराष्ट्रात हाच दर ४५० रुपये आहे. तीनचाकी वाहनांसाठी गोव्यात १५५ रुपये तर महाराष्ट्रात ५०० रुपये तर चारचाकी वाहनांसाठी गोव्यात २०३ रुपये आणि महाराष्ट्रात ७४५ रुपये आकारले जातात. आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, पंजाब राज्यातही महाराष्ट्रापेक्षा कमी दर आकारले जातात. मग महाराष्ट्रातच हे दर दुप्पट वा तिप्पट आकारण्याचे कारण काय? या नंबर प्लेटसाठी १८ टक्के जीएसटी द्यावा लागणार आहे पण ही बाब आरटीओंनी लपवली आहे, हा भुर्दंड ही वाहनधारकाच्या माथीच लादलेला आहे.

नंबर प्लेटचे कंत्राट सुद्धा मंत्रिमंडळ स्थापण्याची घाई सुरु असताना देण्यात आले आहे. मंत्रालयातील काही अधिकाऱ्यांनी संगनमताने यास मंजुरी दिली आहे. यासाठी कंत्राटदाराला दिलेले लेटर ऑफ इंटेट व वर्क ऑर्डर जाहीर करावी. या नंबरप्लेट साठी वाहनधारकांना दिलेली मुदत वाढवावी, इतर जाचक अटी काढाव्यात व या नंबरप्लेट सहज उपलब्ध कशा होतील याकडे लक्ष द्यावे. ही नंबर प्लेट ३१ मार्चनंतर वाहनावर नसल्यास ५ हजार रुपये दंड आकारला जाणार आहे, दंडाची ही रक्कमही जास्त आहे. कोणताही नवीन बदल करताना जनतेला नाहक त्रास होणार नाही याचा विचार केला पाहिजे पण या प्रकरणात तसे होताना दिसत नाही. या सर्व प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी या पत्रात केली आहे.

## इंद्रगढी शाळेत मराठी भाषा गौरव दिन



**घाटनांद्रा :** येथील इंद्रगढी प्राथमिक शाळेमध्ये मराठी भाषा गौरव दिन गुरुवार रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन केले व अभिवादन केले. शाळेच्या आवारात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेतील मराठी विषय शिकवणारे संदिप मोरे होते. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पाचवी ते आठवीपर्यंत मराठी विषय शिकवणारे संदिप मोरे यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक संदिप पिवळ यांनी केले. अध्यक्षीय भाषणात संदिप मोरे म्हणाले की मराठी भाषा ही आपल्यासाठी केवळ एक भाषा नसून ममतेचे, वासल्याचे आणि संस्काराचे बोल आहे. जसे आईचे बोल लेकरासाठी हळुवार आणि प्रेमळ असतात. वेळ प्रसंगी जी आई मुलाच्या चांगल्यासाठी कठोर शब्दही बोलते, तसेच आपल्यासाठी ही मराठी भाषा आहे. तिच्या शब्दाची शक्ती प्रचंड आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

सूत्रसंचालन अविनाश नर्हेराव यांनी केले. आभार रोहिदास मोरे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता "लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, ऐकतो मराठी' या अभिमान गीताने झाली.

# गौताळा अभयारण्यातील, इतिहासाचे सुवर्णपान असणारा गिरीदुर्ग अंतुर किल्ला





सकाळी सकाळीच एका किल्याची पोस्ट निसर्गरम्य खेड तालुका या व्हाटसअप गृपवर औरंगाबादचे सुरज नालगुणे यांनी शेअर केली होती. त्या फोटोतला किल्ला ही नवीन दिसत होता आणि त्या किल्याचे नाव पण ऐकण्यातील नव्हते. त्यामुळे उत्सुकता लागून राहिली.

अशातच मी सुरज नालगुणे यांना फोन केला व किल्याच्या विषयी माहिती विचारली त्यांनी अतिशय सुंदर किल्याचे वर्णन सांगितले व कसे जायचे ते पण सांगितले. एकदा मनात एखादी गोष्ट भरली तर ती करायचीच हा नियमच माझा, त्यामुळे मनात चक्र फिरू लागली. विचार करता करता शनिवार उजाडला तरी अजून काहीच ठरेना मन अस्वस्थ झाले अन किल्ला काही नजरे समोरून जाईना. एखाद्याला देवभक्तीचा नाद लागतो अन तो कोणत्या ना कोणत्या तीर्थक्षेत्राला, देवाला खेट्या मारत असतो अर्थात त्यामागे मागे काही तरी स्वार्थ असतो. असेच काहीसे या गड किल्यांच्या बाबतीत माझे झाले होते.

एक तरी किल्ला अनुभवावा एखादा दिवस तरी त्या गड किल्यांच्या सानिध्यात घालवावा. निसर्गाशी एकरूप व्हावं अस वाटतं अन कधी कधी वाटते या बहुचर्चित तीर्थक्षेत्रांच्या पेक्षा हेच गड किल्ले आपले तीर्थक्षेत्र आहेत. त्यामुळेच या किल्याच्या सानिध्यात जाण्यासाठी त्याला डोळे भरुन पहाण्याची उत्कंठा लागून राहीली. इतक्या दुर ते पण अभयारण्यात किल्याची काही माहिती नाही सोबत कोणी तरी असले पाहिजे म्हणून खुप विचार केला कोणाला सोबत घेऊन जावं तितक्यातच खेडचे रोहीत दादा बोरूडे यांचे नाव आठवले क्षणाचाही विलंब न लावता रोहीत दादाला फोन लावला त्यांना विचारले आपल्याला संभाजी नगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील व जळगाव जिल्ह्याच्या किना-यावर चिमणापूर गावात असणारा अंतूर हा किल्ला पहायला जायचे आहे.

रोहितदादाने लगेच जाऊ म्हणून होकार दिला. शनिवार दि. २९/०२/२०२० रोजी रात्री नऊ वाजता मी भोसरीहून खेडला गेलो, तेथून रोहीत बोरूडे यांना घेतले अन पाबळ मार्गे शिरूर, नगर, औरंगाबाद असे मार्गक्रमण करीत पहाटे तीन वाजता वेरूळला पोहचलो. तेथील वृंदावन रिसोर्ट मधे एक रूम घेतली, दोन तास मस्त आराम केला. सकाळी प्रातःविधी उरकून आम्ही कन्नडच्या गौताळा अभयारण्याच्या दिशेने निघालो... क्षितिजा राऊळी प्रकट दिसु लागे निलउषा! करी जागे झोपी असती तया दावि सूरउषा!क्षितिजावरून सुर्याचे लालबुंद बिंब हळुहळु वर सरकु लागले होते.

जंगलातील सकाळ हलकेच हिरव्या रंगातून सोनेरी रंगाला परिधान करतानाचे हे नयन रम्य दृश्य दिसत होते. बहारदार निसर्ग मनाला आल्हाददायक अनुभूती देत होता. उगवत्या सूर्याच्या स्वागताची गाणी गात पक्ष्यांचे मधुर संगीत श्रवणी पडत होते. गौताळा अभयारण्यातील ती सकाळ खरच मनाला एक वेगळीच अनुभूती देत होती.गौताळा अभयारण्यात जायचे हा विचार पण आमच्या मनात नव्हता हे क्षेत्र बोनस मधे आम्हाला मिळाले होते. मग आम्ही गौताळा अभयारण्याचा पण आनंद घ्यायचा ठरवला. वाटेत जाताना इतिहासकालीन एक वास्तू दृष्टीस पडली आम्ही आवर्जून थांबलो मंदीराच्या आकाराचे दगडात बांधकाम केलेली ही वास्तू सीतामाईची न्हानी म्हणून प्रचलित आहे. तिथे सध्या वानरांचे वास्तव्य आहे. ती वास्तू पाहून आम्ही नागद फाट्यावर पोहचलो तिथे मॅप बाबाने अंतुर किल्ल्यावर जाण्यासाठी आम्हाला डावीकडे वळायला सांगितले आम्ही कोणताच विचार न करता घाट उतरून नागोदला पोहचलो. नास्ता केला नव्हता त्यामुळे कडाक्याची भुक लागली होती वीस किलोमीटरचे अंतर कापून आम्ही नागोदला पोहचलो तिथे हॉटेल दिसले तिथे थांबलो. मस्त गरमागरम भजी घेतली चहा घेतला तो पर्यंत रोहीतदादा हॉटेल वाल्याला किल्याची माहिती विचारू लागले अंतुरी किल्ला म्हणताच हॉटेलवाल्याच्या चेह-यावर वेगळाच भाव दिसला हॉटेलवाल्याने विचारले कुठून आलात? मग रोहीतदादाने रूट सांगितला, हॉटेलवाला म्हणाला इकडून गेलात तर बेलखेडा-गोपेवाडी- दस्तापूरला जाऊन गाडी तेथेच लावून तुम्हाला पायी किल्ला २७०० मीटर चढावा लागेल अडीच तासांचा पायी प्रवास अन आता तर उन वाढले आहे तुम्ही एक करा पुन्हा आले त्या मार्गाने जा. तेथून तुम्हाला डायरेक्ट किल्यावर पोहचता येईल.

नास्ता उरकला अन हाॅटेलवाल्याकडून सुर्यफुलाच्या भाजलेल्या बिया घेतल्या त्या बियांच्या आतील मगज खायला खुप चविष्ट आणि शरीराला पोषक असतो. गाडी पुन्हा मागे घेतली अन सुर्यफुलाच्या बिया खात खात आमचा प्रवास पुन्हा सुरू झाला. घाट चढत असतानाच एक भेकर गाडी समोरून गेलं बहुदा ते चुकलेलं असावं खूप भेदरलेलं वाट फुटेल तिकडे धावत होते. आम्ही मनोमन आनंदी झालो अभयारण्यात आलो आणि एका तरी प्राण्याचे दर्शन झाले अन सहजच चारोळी सुचली...नको सैरवैर होऊ नको तू भिऊथकलेल्या रानातल्या रानजीवामानवी वस्तीतून वाचलास खरा पण आता पोहचशील आपल्या घरा.आता घाटचा रस्ता संपून आम्ही नागापूरच्या रस्त्याने पुढे जावू लागलो अगोदरच उशीर झाला होता अजून बराच दूरचा प्रवास करायचा होता दहा बारा किलोमीटर पुढे आलो असेल तेव्हा आम्हाला सीताखोरी कडे असा बोर्ड दिसला अन आपोआप ब्रेक दाबला गेला, चला एक शेवटचा पाॅईन्ट पाहूयात म्हणून दोघेही गाडी खाली उतरलो अन सीताखोरी च्या दिशेने चालू लागलो. थोडे अंतरावर चालून गेलो तर भली मोठी दरी दिसली तिला पाहून तर डोळे गरगर फिरू लागले. त्या दरीच्या एका कडेला सशा सारखे कान असलेल्या आकाराची एक सरळ कातळ पाहून आश्चर्य वाटले, इतके वर्ष होऊनही ही कातळ सरळ उभी कशी काय? हा मनात प्रश्न पडला. कारण तिला अनेक ठिकाणी भगदाड पडलेली होते अनेक तडे, चिरा पडल्या होत्या, तरी ती कातळ प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत होती. खरच निसर्गाचे हे चमत्कारीक रूप डोळ्यात साठवून पुन्हा पुढच्या प्रवासाला निघालो आलो. आता अभयारण्याचा भाग संपून शेतीपट्टा सुरू झाला होता. उन्हाळ्यात हिरवीगार शेती पाहून मनाला गारवा मिळत होता. मका गहू अशा अनेक पिकांनी शेती बहरली होती ती पहात पहात नागापूरला पोहचलो एक अरूंद कच्चा रस्ता अन तेथून पुढे सहा किलोमीटरवर अंतुरी किल्ला होता. अतिशय खडकाळ रस्ता त्यात आमच्या कडे नाजूक फोरव्हिलर ती म्हणजे होंडा अमेझ, बिचा-याच्या चाशीवर अनेक दगडधोंडे आदळत होते कधी कधी इंजिनला पण घासत होते. वेग मंदावला होता. दहा वीस च्या स्पीडने गाडी सुरू होती. एका शेताजवळ बटाट्याच्या आकाराचे पीक काढताना काही माणसं दिसली कारण दूरून बटाटा तर दिसत नव्हता. परंतू काय आहे पहावे म्हणून जवळ जावून पाहिले तर आठ दहा एकरात आल्याचे पीक काढण्याचे काम सुरू होते. आयुष्यात पहिल्यांदाच आल्याचे पीक काढताना पहात होतो. तेथील शेतक-याला थोडी आल्या विषयी माहिती विचारली व कधी लागवड केली होती हे पण विचारले?, त्यांनी सांगितले मागच्या जून मधे लागवड केली होती. आता फेब्रुवारी सुरू आहे तब्बल नऊ महिन्यानंतर हे पीक काढायला आले होते.

संपूर्ण गौताळा परिसरात आल्याचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. ते पीक काढल्यावर गुजरात, राजस्थान, मुंबई, पुण्याला विक्रीसाठी जाते. असे शेतकरी सांगत असतानाच त्यांने दोन्ही हातात मावतील इतके आले माझ्या हातावर ठेवले, इतका अमुल्य वानवळा मिळाला होता. शेतक-याचे आभार मानले अन पुढे निघालो. कच्चा रस्ता पुढे जास्तच खराब होता. दूर पर्यंत एकही माणूस दिसत नव्हता. पुढे गेल्यावर एक छोटे तळे व ओपन चौथा-यावर हनुमंतरायाचे मंदिर होते ते पाहून किल्ला दिसतो का हे बारीक न्याहाळू लागलो पण किल्याचा काही माघमूसही दिसेना, पुढे चलण्याशिवाय पर्याय नव्हता माळरान जाऊन जंगल सुरू झाले होते अन या विराण आणि वन्यजीव असणा-या जंगलात फक्त हम दो शेर होतो.इतका रोड खराब असूनही गाडी कशी तरी किल्या पर्यंत घेऊन आलो होतो. कारण जंगलात व किल्याच्या आजूबाजूला जंगली प्राणी व पाखरांच्या शिवाय कोणीच नव्हते काहीतरी संरक्षण असावे म्हणून गाडी किल्यापर्य´त घेऊन आलो होतो. भोसरी पासून हा किल्ला ३१७ किलोमीटरवर होता, औरंगाबाद पासून ९० किलोमीटरवर व कन्नड पासून ३० किलोमीटर हा किल्ला चिमणापूर गावात कन्नड तालुक्यात व संभाजी नगर जिल्ह्यात होता. किल्याजवळ आलो खरा पण रस्ता सापडेना मग मी अन रोहीत बोरूडे किल्याच्या मोठ्या बुरूजा कडून निघालो पुढे आलो तर किल्याच्या आणि जमिनीच्या मधे कातळ खोदून खुप मोठा खंदक खोदला होता. इथून उतरून जायचे का? हा प्रश्न मनात आला अन काळजाची धडधड वाढली. अशातच रोहितदादा हळूहळू त्या खंदकात उतरायला लागले. पण त्यांना पण जमेना निम्या पर्यंत गेलेले पुन्हा वरती पण येता येईना त्यांचे हे हाल पाहून माझे धाडस होईना मी बराच वेळ तसाच उभा राहिलो. तोपर्यंत रोहितदादा पूर्ण खंदकात उतरले पण पुर्ण घामाघूम झाले होते पुढे काय त्यांना पण प्रश्न पडला होता. ते खूप वेळ मला आवाज देत होते पण मला त्यांचा आवाज ऐकू येईना त्यामुळे रोहितदादा खुपच घाबरले होते. मी पण उंचावर एकटाच राहिलो होतो काही करावे सुचेना. तेवढ्यात रोहित दादांचा आवाज आला सर खुपच सोपा रस्ता दिसतो आहे तुम्ही तिकडून या; फक्त जरा चालावे लागेल. मी हो म्हणालो. जिथे गाडी लावली होती तिथे मी एकटाच परत आलो. अन रस्त्याची शोधा शोध केली, पहातो तर काय एक दगडी रस्ता सरळ किल्याच्या मुख्य दरवाजाकडे जात होता. मग मी त्या रस्त्याने निघालो, आजूबाजूला घनदाट जंगल, पाणगळी मुळे दूरचे पण सहज दिसत होते. बहिरी ससाण्याच्या ऐवजी आकाशात व झाडांझुडूपांच्यावर चिट पाखरू पण दिसेना. भयान शांतता त्यामुळे नको त्या विचारांची गर्दी मनात दाटू लागली. दगडी रस्त्यावर झाडांची पाणगळ झाल्याने पूर्ण रस्ता पानांनी झाकोळून गेला होता. मधेच कुठून तरी सळसळ ऐकू यायची, पाणगळीतल्या त्या सळसळीने तर छातीत धस्स होत होते, आपोआप हदयाचे ठोके वाढत होते.तोपर्यंत रोहितदादा संपूर्ण खंदक उतरून माझ्याच रस्त्याला येवून थांबले होते ते सुद्धा खुप घाबरलेले दिसत होते ते मला म्हणाले मी खुप वेळा तुम्हाला आवाज दिला पण तुमच्या पर्यंत आवाज पोहचतच नव्हता. दोघांची पण एकत्र भेट झाल्याने एकमेकांना धीर आला होता. समोरच कपारीच्या अगदी कडेला अंतुरी किल्याचा दक्षिणमुखी महादरवाजा दिसत होता.

अजूनही सुस्थितीत होता अलिकडेच त्याला भव्य असा लाकडी दरवाजा बसविण्यात आल्याने मुख्य दरवाचा अतिशय सुंदर दिसत होता. बाहेरच पहारेक-यांच्या उभे रहाण्याच्या ठिकाणावर शरभशिल्प दिसत होते. छोट्या दरवाजातून आम्ही किल्यात शिरलो. दोन्ही बाजूला उंच तटबंदी होती. तट व दरवाज्यावर जाण्यासाठी पाय-या बांधल्या होत्या. पुढे पहिल्या दरवाज्याच्या नव्वद अंशाच्या कोनातच दुसरा मुख्य पुर्वाभिमुख दरवाजा होता. दरवाजाच्या वरील दोन्ही बाजूंचे बुरूज चौकोनी आकारात बांधलेले होते. दरवाजाच्या आतील बाजूस घुमट व कमानी दिसत होत्या त्यावर कोरीव शिल्प व कमळपुष्प कोरलेली होती. जणू काही गडाची मुख्य कचेरी असावी. पुढे आम्ही तिस-या दक्षिणमुखी दरवाज्या जवळ पोहचलो त्या भल्या मोठ्या दरवाजाच्या कमानीवर निजामशाह यांच्या काळातील मलिक अंबर यांचा या किल्याच्या बांधकामाविषयी पार्शियन भाषेत शिलालेख होता. तिसरा दरवाजा पार करून आम्ही किल्यावर पोहचलो हा किल्ला समुद्र सपाटी पासून 2757 फूट उंचीवर असून 32 एकरात हा किल्ला पसरला आहे. बत्तीस एकराच्या चोहोबाजुंनी तटबंदीने हा किल्ला वेढलेला आहे. चोहोबाजुंनी खोल द-या आणि मधोमध हा किल्ला अंडाकृती आहे. 17 व्या शतकातील हा किल्ला यादवकाळात बांधला होता. अनेक साम्राज्य या किल्यावर राज्य करून गेली होती. अल्लाद्दीन खिलजी व मराठ्यांच्या मधे घनघोर असे युद्ध याच किल्यावर झालेले आहे. फोटो काढीत काढीत आम्ही किल्यावरील तलावा जवळ येवून पोहचलो, हिरव्या पाण्याने तुडूंब भरलेल्या तलावात असंख्य जलपर्णी दिसत होत्या. तलावाच्या उजव्या बाजूला मज्जिद तर डाव्या बाजूला अतिशय सुंदर राजवाड्याचे अवशेष दिसत होते. लोहचुंबकाने लोखंडाला खेचावे तसे मला या अंतूर किल्याने खिळवून ठेवले होते. मला हा तलाव व तेथील बाजूचे बांधकाम पाहून चिखलद-यातील गवळी राजाने बांधलेल्या गाविलगडाची आठवण झाली होती. गडावरील अंबरखाना, धान्यकोठारे, शस्त्रागार अनेक मोठ्या इमारती पाहून मी आणि रोहित दादा मोठ्या टेहळणी बुरूजा कडे निघालो. इतका मोठा किल्ला पण आमच्या दोघांच्या शिवाय या किल्यावर तिसरे कोणीच नव्हते, अन जरी असले तरी लपून बसलेले जंगली जनावरं असणार असे मनोमनी वाटत होते. तीन कमांनीच्या दरवाजातून टेहळणी बुरूजाच्या आवारात एक पिराचा दर्गाह होता. मी त्या दर्ग्यात जावून दर्शन घेतले बाहेर आलो तितक्यात एक विचित्र आवाज तिथे येवू लागला बिबट्याच्या लहान पिलांचा हा आवाज असावा किंवा एखादया पक्ष्यांचा आवाज असावा असा तर्क आम्ही दोघांनी पण लावला. खुप वेळच्या आवाजाने आमची मात्र पाचावर धारण बसली होती. क्षणभरातच आम्ही तो बुरूज सोडला, आता अशी मनात भीती बसली की कधी किल्यातून बाहेर पडतो असे झाले होते. मी आणि रोहितदादा एकमेकांना धीर देत होतो काहीच झाले नाही अशा आविर्भावात होतो. पण दोघांची मनातली अवस्था खुप भितीदायक बनली होती.

किल्याच्या पश्चिम बाजूस काही लेण्या दिसल्या तिथे जाण्याचे पण धाडस होईना. पाऊलांची गती वाढलेली होती. एका टेकडावरील धान्याच्या अंधा-या कोठारात डोकावले तर तिथे पण वेगळाच आवाज ऐकू आला, आता मात्र धीर सुटत चालला होता. पण किल्यावर इतक्या सुंदर वास्तू होत्या त्या पाहिल्या शिवाय पाऊल पुढे सरकेना. वास्तू जरी सुंदर होती तरी किल्यावर येणा-या महाभागांनी पत्रावळ्या, दारूच्या बाटल्या, बिसलरी बाटल्यांनी अन प्लॅस्टिकच्या इतर वस्तूंचा जागोजागी खच पडलेला दिसत होता. प्रत्येक ऐतिहासिक वास्तूच्या दगडांच्यावर फलताड प्रेमींनी नाव कोरून वास्तूला दुषीत केलेले दिसत होते. महाराष्ट्राचे गड किल्ले हे तिर्थक्षेत्रापेक्षाही श्रेष्ठ आहेत हे जरी प्रत्येकाला समजले तरी त्याचे पावित्र्य राखले जाईल अन्यथा अशाच या ऐतिहासिक वास्तू नष्ट होतील यात शंकाच नाही. आपल्या या वैभवशाली महाराष्ट्राच्या गड किल्यांचे, पवित्र पावन स्थळांचे रक्षण करण्याचे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. आज अनेक आक्रमण निमूटपणे सहन करतो, शरीर पोलादा सारखे बनवू शकतो, कोणताही ॠतू यांच्यावर कसलाच परिणाम करीत नाही, वेदनेचे नाव ही उरत नाही तो योगी त्याच प्रमाणे हा अंतुर किल्ला मला एखाद्या योगी सारखा वाटला..या मातीने दिला वारसा कठोर छाती दगडाची,दिली नद्यांनी ध्येयासाठी समर्थता बलिदानाची,पहाड़ डोंगर इथे सांगती अजिंक्यता अभिमानाची,

जगदंबेचा पालव येथे लढवय्यांच्या सदा शिरी,रणफंदीची जात आमुची कोण आम्हा भयभीत करी!कुसुमाग्रजांच्या या काव्यपंक्तीना आठवतच अंतुर किल्ल्याचे दर्शन घेतले अन जड अंतःकरणाने निरोप दिला. तशी या किल्याची फारशी माहिती उपलब्ध नाही, किंवा येथे कुठल्याही प्रकारचे गाईड किंवा मार्गदर्शिका नसल्यामुळे किल्याची माहिती नसूनही चुकीचा विषय मांडणे मनाला पटत नाही. जितकी माहिती मला मिळाली मी स्वतः पाहिली तीच माहिती मी या लेखात नमूद केलेली आहे. माझी महाराष्ट्रातील तमाम गड किल्ले प्रेमींना विनंती आहे एकदा तरी या अंतुर किल्ल्याला नक्कीच भेट दया ...-



**संदीप राक्षे**
भोसरी पुणे २६८६५७४२१४२१